5/ (51)

Exh.06

Order

-------------------------

Verification read & recorded

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.01.14 17:13:55 +0530

2nd. Jt. JMFC Newasa

क्रि.के.नं. 18/2025

## व्हेरिफिकेशन

याकामी मी रणजीत शिवाजी नाळे, वय : 41 वर्षे, धंदा-नोकरी, विद्यमान शाखाधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा-नेवासा, ता.नेवासा, जि.अहमदनगर सत्यप्रतिज्ञेवर खरे सांगतो की,

मी भारतीय स्टेट बँकेत नोकरीस असून सध्या नेवासा येथील शाखाधिकारी म्हणून काम पाहत आहे. फिर्यादी बँकेने मला आरोपीविरुध्द कारवाई करण्याचे सर्व अधिकार दिलेले असल्याने व प्राधिकृत केल्याने मी आरोपीविरुध्द सदरची केस केलेली आहे.

आरोपीने फिर्यादी बँककडे **डेअरी व्यवसायासाठी** रक्कम रुपये 1,40,000/- (एक लाख चाळीस हजार रुपये) कर्ज रकमेची मागणी केली. त्याप्रमाणे आरोपीस फिर्यादी बँकेने सदरचे कर्ज ता.04/07/2023 रोजी मंजूर केले व सदर कर्ज आरोपीने फिर्यादी बँकेचे शाखेतून उचलले आहे. सदर कर्ज रकमेवर व्याजाचा दर बँकेच्या अटी व नियमानुसार ठरलेला आहे. सदरचे कर्ज थकीत गेले आहे. आरोपीने कर्ज घेतलेपासून आजपावेतो कर्जाऊ रकमेची फेड नियमित हप्त्याप्रमाणे केलेली नाही. सदरची थकीत रक्कम फिर्यादी बँकेने तोंडी व लेखी अनेकवेळा आरोपीकडे मागणी करुनही आरोपीने त्याकडे दुर्लक्ष केले व रक्कम भरली नाही. त्यामुळे आरोपीचे कर्ज खाते थकीत गेले व त्याचे कर्ज खाती एकूण रक्कम रुपये 95,176/- व त्यावरील व्याज इतकी थकबाकी होती व आहे.

आरोपीने त्याचे कर्ज खात्यात थकबाकीपोटी रक्कम जमा होणेसाठी भारतीय स्टेट बँक, शाखा-नेवासा, ता.नेवासा यांचेकडील त्याचे सेव्हिंग्ज खाते क्र.41740712534 वरील चेक नं.407386 दि.19/11/2024 रोजीचा रक्कम रुपये 24,236/- (चोवीस हजार दोनशे छत्तीस रुपये) चा चेक फिर्यादी बँकेस दिला. सदरचा चेक देतांना चेकमध्ये नमुद रक्कम मिळेल, असा भरवसा व खात्री आरोपीने फिर्यादी बँकेस दिली. आरोपीचे विनंतीनुसार सदरचा चेक वटविण्यासाठी फिर्यादी बँकेचे शाखेत दिला असता तो चेक पुरेश्या निधीअभावी (funds in sufficient) असा शेरा मारुन दि.19/11/

2024 रोजी न वटता परत आला. त्यामुळे फिर्यादी बँकेस चेक नमुद रक्कम मिळाली नाही. सदरचा चेक देऊन जाणुनबुजुन आरोपीने फिर्यादी बँकेची फसवणुक केली व चेकची रक्कम तारखेच्या दिवशी मिळणार नाही अशी व्यवस्था केली. आरोपीने फिर्यादी बँकेस चेक देऊन फौजदारी स्वरुपाचा गुन्हा केला आहे.

त्यानंतर फिर्यादी बँकेने आरोपीस ता.25/11/2024 रोजी वकीलांमार्फत रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठवून चेक नमुद रकमेची मागणी केली. सदर नोटीस आरोपीस पोस्टमन मार्फत दि.17/12/2024 रोजी मिळूनही आरोपीने चेकमध्ये नमुद रक्कम फिर्यादी बँकेस आणून दिली नाही व त्याद्वारे आरोपीने एन.आय. ॲक्ट कलम 138 नुसार गंभीर स्वरुपाचा गुन्हा केलेला आहे.

अशाप्रकारे आरोपीचा सदरचा चेक डिसऑनर झाला आहे. आरोपीने जाणून बुजून फिर्यादी संस्थेस सदरची रक्कम देत नाही व देण्याची टाळाटाळ चालवली आहे. सदरचा चेक वटला जाणार नाही याची आरोपीस माहिती व ज्ञान असताना सुध्दा सदरचा चेक देवून फिर्यादी संस्थेची आरोपीने फसवणुक व विश्वासघात केलेला असून आरोपीने गंभीर स्वरुपाचा गुन्हा केलेला आहे.

तरी मे.कोर्टास नम्र विनंती की, फिर्यादी संस्थेचा पुरावा घेण्यात येऊन आरोपीस कडक शासन करण्यात यावे व धनादेशाचे दुप्पट रक्कमेचा आरोपीस दंड करुन फिर्यादीला न्याय मिळावा, ही विनंती.

येणेप्रमाणे फिर्यादी संस्थेतर्फे व्हेरिफिकेशन असे.

**नेवासा**

**दिनांक :- 14/01/2025** **समक्ष**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**

**कोर्ट नं. नेवासा**

**फिर्यादीतर्फे माहितगार इसम**

verified

14-1-25

सहा. अधीक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर

नेवासा